Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# वर्तनबदलासाठी पर्यावरण शिक्षण, संवर्धन व निसर्गायण

प्रा. श्रीमती. मंगला शामराव पाटील,
अध्यापिकाचार्या,
महर्षि शिंदे अध्यापक विदयालय, नाशिक.

**प्रास्ताविक :**

मानवाने गेल्या दोन तीन शतकात लक्षणीय अशी भौतिक प्रगती केलेली आहे. ही भौतिक प्रगती करतांना त्याला निसर्गाच्या आद्य शक्तींचा विसर पडत चाललेला दिसतो. वृक्षतोड, शहरीकरण, कारखानदारी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या–लोकसंख्या विस्फोट, हवा, पांणी, जमीन व इतर नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदुषण, उर्जेची टंचाई इ. समस्या निर्माण झाल्या आहेत. समस्त जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे, म्हणजेच आजचे युग हे समस्यांचे युग आहे. या अनेकविध समस्यांपैकी 'पर्यावरण संरक्षण ' ही प्राधान्यक्रम असलेली समस्या होय. पर्यावरण व मानव यांचा घनिष्ठ संबंध आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासास मनुष्य अधिक प्रमाणात जबाबदार आहे. वृक्ष, पाणी, हवा, वायू, डोंगर, नदी, समुद्र हे सारे पर्यावरणाचे घटक. हे सर्व घटक एकमेकांवर अवलंबून असतात. या सर्वांचा योग्य प्रकारे उपयोग झाला पाहिजे. तसा तो न झाल्यास पर्यावरणात असमतोल निर्माण होतो. पर्यावरणाचा ऱ्हास होतो, नाश होतो, आणि मानव पशू –पक्षी, जलचर, सर्वांच्याच जीवनावर त्याचे दुष्परिणाम होतात व पर्यावरण रक्षणाची जबाबदारी वाढते.

**पर्यावरण :** व्युत्पत्तीशास्त्रानुसार पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती.

**बर्नार्ड नेबेल :** विविध परिसंस्था प्रणालींचे परस्पर संबंधातील संतुलनमूलक तत्त्वांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे ' पर्यावरण शास्त्र ' होय.

**जॉन टर्क :** पृथ्वीवरील सर्व घटकांचे आकलन, त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.

**डॅनियल चिरास :** जैविक व अजैविक घटकातील परस्पर क्रियांचा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.

**पर्यावरण शिक्षण :**

पर्यावरणाचे, पर्यावरणातून, पर्यावरणासाठीचे शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

**अमेरिका पर्यावरण शिक्षण कायदा (१९७०) :**

पर्यावरण शिक्षण, म्हणजे मानवाच्या त्याच्या नैसर्गिक व मानवनिर्मित परिसराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणारी एक प्रकिया होय. यात संपूर्ण मानवी पर्यावरणाचा, लोकसंख्या, प्रदूषण, साधन संपत्तीचे वितरण,

ऱ्हास व संरक्षण, वाहतूक यंत्रणा, तंत्र विज्ञान तसेच ग्रामीण व शहरी नियोजन यांच्याशी संबंधित असणारा संबंधही अभिप्रेत आहे.

**युरोपियन अहवाल :**

पर्यावरण शिक्षण हे काही विविष्ट समस्यांवर केंद्रीत झालेले असते. उदा. मूल्यांचे दृढीकरण, समाजाचे कल्याण, मानवाचे अस्तित्व अबाधित राखणे, विदयार्थ्यांच्या कृतिशीलतेचा आधार घेणे. इ. व या सर्वांमधून सदयःस्थितीचा आणि भविष्याचा वेध घेणे.

**फिनिश नॅशनल कमिशन (१९७४) :**


पर्यावरण रक्षणाची उद्दिष्टये कार्यान्वित करण्याचा एक मार्ग म्हणजे पर्यावरण शिक्षण.

**युनेस्को (१९७६) चा अहवाल :**

पर्यावरणाबद्दलचा एकात्मिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विविध विद्याशास्त्रांचे व शैक्षणिक अनुभवांचे पुर्नउद्बोधन व सांधेजुळणी करण्याचे फलित म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

पर्यावरण शिक्षणात खालील घटकांचा समावेश होतो.


**पर्यावरणातील घटक :**




**पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टये :**


१. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघ या संस्थेने राष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची पुढीलप्रमाणे उद्ददिष्टे सांगितली आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015




**पर्यावरण शिक्षणाची गरज :**

सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गरजांतून पर्यावरण शिक्षण हा विषय उदयास आला. प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे सर्व क्षेत्रांमध्ये जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. प्रगती, औदयागिकीकरण, शहरीकरण, भौतिक सुखाची लालसा आणि वाढता चंगळवाद इ. मुळे जगभरातील नैसर्गिक साधन संपत्तीवर प्रचंड ताण पडत आहे. औदयागिकीकरण आणि शहरीकरणामुळे वायू, जल, भूमी आणि ध्वनी प्रदूषण यांनी गंभीर रुप धारण केले आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचे मोठया प्रमाणावर शोषण होत आहे. भावी पिढीसाठी ' पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे ' आपले कर्तव्य आहे. संपूर्ण पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. हे टाळण्यासाठी प्रत्येकाला पर्या वरण शिक्षण देणे गरजेचे आहे.



**पर्यावरण संवर्धन :**

संवर्धन ही जतनाची पुढील पायरी. जतन म्हणजे जी गोष्ट आपल्याजवळ आहे तीची जपणूक करणे तर संवर्धन म्हणजे संबंधित गोष्टीमध्ये वृध्दी करणे व तिचा विकास साधणे.

पर्यावरणाचे संवर्धन म्हणजे पर्यावरणाच्या जैविक आणि अजैविक घटकांचे संवर्धन करणे होय.

पर्यावरण संरक्षणासाठी मानवाने स्वतःची विचारसरणी बदलणे गरजेचे आहे.

**अल्बर्ट आईनस्टाईन** यांनी म्हटले आहे – अणुतून मुक्त झालेल्या शक्तीनं सर्व काही बदललं आहे. बदललेली नाही ती आपली विचार प्रणाली. जर मानवजात वाचायची असेल तर एका अगदी वेगळया विचार पध्दतीची आज आवश्यकता आहे.

**पर्यावरणाची वैशिष्टये :**

१. पर्यावरण ही सर्वांची, सर्वांसाठी आणि सर्वांकरवी चालणारी व्यवस्था आहे.
२. पर्यावरणातील प्रत्येक गोष्ट विक्रेंद्रित आहे उदा. ह्वा, पाणी, जमीन, झाड, पशू, कचरा इ.
३. प्रत्येक पदार्थ विघटनक्षम आहे.
४. ‘ जीवो जीवस्य जीवनम् ’ दवारे निसर्ग एक संतुलित स्थिती कायम ठेवतो.

या गुण वैशिष्टयांच्या आधारे काम करणारी पर्यावरणाची यंत्रणा ही सदैव एक आदर्श स्थिती राखण्याचा प्रयत्न करीत असते. परिस्थितीतला कोणताही घटक स्थिर नसल्याने ही आदर्श स्थिती देखील ‘गतिमान संतुलनाची’ असते. निसर्गाच्या या व्यवस्थेत सर्वांत शेवटी जन्माला आलेली जीवजाती म्हणजे माणुस. प्रचंड बुध्दिमत्तेची देणगी हया जीवजातीनं पर्यावरणाचं संतुलन ढवळण्यासाठी आणि निसर्गव्यवस्था उच्छिन्न करुन टाकण्यासाठी वापरलेली आहे. संसाधनांचा क्षय आणि प्रदूषण हया पर्यावरणाच्या प्रमुख समस्या आहेत.

आपल्यासमोर पर्यावरणाच्या ज्या समस्या उभ्या ठाकल्या आहे त्यांच्या मुळाशी ही मानवी प्रवृत्ती आहे. आपण आपल्या लाभासाठी नैसर्गिक संसाधनं आणि अन्य सजीव या दोन्हींच शोषण करतो. देकार्त, बेकन, डार्विन यांच्या विचारप्रणालीच्या स्वीकारातून सर्वच व्यवस्था स्तेय मूलक, शोषण मूलक अशी बनली आहे. आपण फक्त घेत आहोत देत काहीच नाही आणि जे काही आपण देतो ते असतं विषारी, घातक, अविघटनक्षम. याचा परिणाम निसर्ग चक्रावर होतो. मानवनिर्मित कचरा, जल, वायू हे देणगी न राहता समस्या बनते. वरदान न राहता शाप बनतो. प्रदूषण नावाची समस्या तो निर्माण करतो.

**अल्बर्ट शाईट्त्सर** म्हणतात त्याप्रमाणे आपण पृथ्वीचा सर्वनाश करुनच थांबू.

मानवाला या वास्तवाची जाणीव झाली आहे. जगभरातील विचारी माणसं हया वास्तवाने चिंतीत झाली आहेत. जगभरातले शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ हया समस्येच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करत आहेत. पण त्यांना यश मिळण्याची जराही शक्यता नाही. कारण हया समस्या मूलतः विज्ञानाच्या नसून मानवी वर्तनाच्या आहेत.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**निसर्गायण :**

निसर्गाकडे जाणे म्हणजे निसर्गायण ! 'अति सर्वत्र वर्जयते' हा निसर्ग नियम परंतु मानवाने अति हव्यास, अतिरेकी भोगवादी प्रवृत्ती यामुळे निसर्गाच्या समतोलात ढवळाढवळ केली आहे. पर्यावरणाच्या ज्या समस्या आहेत त्याचे मुळं मानवी वर्तन, मानवी स्वभाव आणि मानवी दृष्टिकोन यांत आहे. मंानवाच्या आत्मकेंद्री वर्तनामुळे या समस्या निर्माण झाल्या आहेत.

पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण, संतुलन याला महत्त्व दिले आहे. परंतु वैज्ञानिक, पायावर तंत्रज्ञानाची जी प्रगती झाली त्यामुळे तिने मानवी जीवनात अकल्पित भौतिक समृध्दी आणली.

**डार्विनच्या उत्क्रांतीवादाचे दोन सिध्दांत :**

१. अस्तित्वासाठी लढा
२. सर्वक्षेष्ठ तोच टिकेल.

जे बुध्दीनं, शक्तीनं, कौशल्यानं वा अन्य गुणांनी श्रेष्ठ होते त्यांना हया सिध्दांतामुळे अन्य सर्वांच शोषण करण्याचा जणू परवानाच मिळाला. या शोषणातून दुर्बल मानवसमूह व निसर्गही सुटला नाही.

**आईनस्टाईनचा सिध्दांतः**

'जड द्रव्य आणि शक्ती ही एकमेकांत परिवर्तनीय आहेत' हा जडवादी विचारांना उलथून टाकणारी क्रांतिकारी घटना. आपल्याला दिसणाऱ्या जड वस्तूंना वास्तविक असं अस्तित्व नाही. तर ते शक्तीचं तात्कालिक अवस्थांतर आहे असं हा सिध्दांत सांगतो. हया विश्वात मुलभूत जर काही असेल तर ती आहे शक्ती.

आपल्यापुढच्या समस्या सोडविण्यासाठी पर्यावरणीय दृष्टिकोण, निसर्गाशी सुसंवादी अशी जीवनपध्दती तत्वज्ञानात्मक पाया आपण समजावून घेतला पाहिजे. विज्ञानातल्या अत्याधुनिक संशोधनातून हया विश्वातल्या अंतिम सत्याविषयी वैज्ञानिकांना जे जाणवत आहे ते वेदान्ताच्या तत्वज्ञानाशी मिळतंजुळतं आहे. विज्ञान आणि तत्त्वज्ञान हया दोन्हींच्या साहाय्यानं हे अंतिम सत्य पुनश्च एकवार समजावून घेतलं पाहिजे.

सत्यदर्शनातून विश्वाशी असणाऱ्या आपल्या नात्याची, विश्वातल्या आपल्या स्थानाची, निसर्गातल्या आपल्या स्थानाची जाणीव पुन्हा एकदा आपल्याला होईल ही अपेक्षा.

निसर्गातलं हे स्थान घेण्यासाठी निसर्गाकडे जाणं म्हणजेच 'निसर्गायण'!

आज आवश्यकता आहे ती विज्ञानाला अध्यात्माची जोड देण्याची, सहस्त्र सूर्यांच्या प्रकाशात विज्ञान ज्या सत्याकडे जात आहे ते अध्यात्माला फार फार पूर्वीच गवसलं आहे. आध्यात्मिक ज्ञानातून वर्तन – परिवर्तन होतं. वैज्ञानिक ज्ञानातून तसं होत नाही.

निसर्गाकडे जाणं म्हणजे आदिमानवासारखं राहणं नव्हे, आपल्याजवळ सारं आहे. ज्ञान, क्षमता, तंत्रज्ञान सर्वकाही. पण हे सारं नीट जपून न वापरण्याचे दुष्परिणामही आता आपल्याला ठाऊक आहेत. अतिरेकी उपभोगांची

परिणती कशात होते, हे आपण जाणतो. हयातून आपल्याला एक शहाणपण आलं आहे. त्या शहाणपणातून आपण आपले उपभोग स्वेच्छेनं संयमित ठेवणार आहोत. आदिमानवाचे कमी उपभोग ही अज्ञानमूलक बंधनाची स्थिती असते. आपण स्विकारायची आहे ती ज्ञानपूर्वक निवृत्ती !

निसर्गायणची आवश्यकता लक्षात घेता व्यावहारिक पातळीवर दोन स्तरांवर कार्य करण्याची आवश्यकता आहे.

१. व्यक्ती व परिवार हया पातळीवर आपण आचरणात आणायला हवी निसर्गस्नेही जीवनशैली.
२. दुसऱ्या स्तरावर हवी पर्यावरणस्नेही विकास नीती.

यासाठी आजची विकासनीती पुढीलप्रमाणे असायला हवी :

१. सामाजिक व राष्ट्रीय धोरणं पर्यावरणस्नेही बनायला हवीत.
२. संसाधनांचा जपून वापर करणं.
३. शक्यतो नवीकरणक्षम संसाधनांच वापरणं.
४. उर्जेचा कमीत कमी वापर.
५. नवीकरणक्षम उर्जास्त्रोतांवर भर.
६. रोजगाराभिमुख उत्पादनशैली.
७. श्रमप्रधान समुचित तंत्रज्ञानाचा वापर.
८. अविवेकी यांत्रिकीकरण, उदयोगीकरण, वाहतूक टाळावी लागेल.

विकासनीती कशीही असो आपली जीवनशैली अधिकाधिक निसर्गस्नेही बनवायला हवी. त्यासाठी आपली जीवनशैली किमान गरजांची असली पाहिजे.

१. शक्य होईल तिथे वापर टाळणं.
२. वापर टाळणं अशक्य असेल तिथे तो कमीतकमी करणं.
३. पूर्णपणे वापर करणं.
४. पुर्नवापर वा पुर्नघटन करणं.

**समारोप :**

पर्यावरणाची समस्या ही सर्वव्यापी बाहय निसर्गातील असली तरी तिचे मुळ मानवाच्या वर्तनात आहे. त्यामुळे पर्यावरण शिक्षण, संवर्धन व निसर्गायण या बाबी मानवी वर्तनबदलासाठी आवश्यक आहेत. मानवी वर्तनात बदल झाल्यास निसर्गाचे संतुलन ठेवण्यास मदत होईल.

**संदर्भग्रंथ :**

१. दिलीप कुलकर्णी (२००७) निसर्गायण, राजहंस प्रकाशन, पुणे.

२. डॉ. किशोर चव्हाण, प्रा. शोभा आहेर (२००८) पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

३. डॉ. के.म. भांडारकर (२००६) नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

४. डॉ. हेमलता पारसनीस, डॉ. जयश्री बहुलीकर (२००६) नित्य नूतन प्रकाशन, पुणे.